मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना या योजनेंतर्गत खाजगी प्रशिक्षण संस्थांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत. सन २०१७-१८.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग.
शासन निर्णय क्र. मोशियो-२०१८/प्र.क्र.३६/का-९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३१ मार्च,२०१८.

<u>वाचा:-</u>

१) **शासन निर्णय क्रमांक:** राअआ-२०१२/१०८/प्र.क्र.१८/का-९, दिनांक २५ जून, २०१३.
२) **शासन निर्णय क्रमांक:** मोशियो-२०१४/प्र.क्र.१३/का-९, दिनांक २२ ऑगस्ट, २०१४.
३) **शासन निर्णय क्रमांक:** मोशियो-२०१५/प्र.क्र.५/का-९, दिनांक ३० मार्च, २०१५
४) **शासन निर्णय क्रमांक:** मोशियो-२०१५/प्र.क्र.५/का-९, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६
५) **शासन निर्णय क्रमांक:** मोशियो-२०१५/प्र.क्र.२०८/का-९, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६
६) **शासन निर्णय क्रमांक :** मोशियो-२०१५/प्र.क्र.२०८/का-९, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१६
७) **शासन निर्णय क्रमांक:** मोशियो-२०१५/प्र.क्र.५/का-९, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१६
८) **शासन परिपत्रक** , वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि.१८ एप्रिल,२०१७ व दि.०६ फेब्रुवारी २०१८.
९) **शासन परिपत्रक** , वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेत संधी उपलब्ध करण्याकरिता केंद्रिय लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/बँकींग सेवा भरती इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या पूर्व तयारीसाठी आणि इयत्ता १० वी व १२ वी अनुत्तीर्ण अल्पसंख्याक उमेदवारांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरू करण्याकरीता संदर्भ क्र. १ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. या योजनेंतर्गत राज्यातील मुंबई, नाशिक, अमरावती, नागपूर, ठाणे व पुणे या शहरांमध्ये अल्पसंख्याक उमेदवारांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांची निवड संदर्भ क्र. २ अन्वये करण्यात आली आहे. उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन वर नमूद प्रशिक्षण केंद्रामधील प्रशिक्षण संस्थांनी अनुदान मागणीचे प्रस्ताव शासनास सादर केले आहेत. उपरोक्त प्रशिक्षण संस्थांमधील मुंबई येथील एम.टी.एज्युकेअर, मुंबई या प्रशिक्षण संस्थेला उपरोक्त संदर्भ क्रमांक ५ च्या शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ च्या सामाईक प्रवेश परीक्षेसाठीचे टप्पा अनुदान वितरीत करण्यात आले आहे. आता सदर संस्थेने सन २०१५-१६ चे उर्वरित टप्पा अनुदान, सन २०१६-१७ चे सामाईक प्रवेश परीक्षा ११वी व १२वी यासाठीचे संपूर्ण अनुदान तसेच सन २०१६-१७ साठीचे १०वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठीचे संपूर्ण अनुदानाची मागणी केली आहे. मुंबई केंद्रावरील गर्जतो मराठी, बोरीवली मुंबई या संस्थेस बँकिंग अभ्यासक्रमासाठी संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयान्वये प्रथम टप्पा अनुदान वितरीत करण्यात आले आहे. संस्थेने सदर उर्वरित अनुदान व सन २०१६-१७ साठीचे संपूर्ण अनुदानाची मागणी केली आहे.

अमरावती केंद्रावरील शेतकरी शिक्षण संस्था, अमरावती या संस्थेस संदर्भ क्रमांक ५ च्या शासन निर्णयान्वये, केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग तसेच राज्य लोकसेवा आयोग (अराजपत्रीत) या अभ्यासक्रमासाठीचे प्रथम टप्पा अनुदान वितरीत करण्यात आले आहे. संस्थेने सन २०१५-१६ चे उर्वरित अनुदान व सन २०१६-१७ ची संपूर्ण अनुदानाची मागणी केली आहे.

३. उपरोक्त संस्थेने सादर केलेल्या अनुदान मागणीच्या प्रस्तावाची छाननी करुन संदर्भ क्रमांक १ च्या दिनांक २५.०६.२०१३ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार सादर केलेले व प्रत्यक्ष ८५% उपस्थिती असलेलया विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार अनुदान मंजूर करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

"मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना" या योजनेंतर्गत शासन निर्णय, दिनांक २५.०६.२०१३ मधील तरतूदीची पूर्तता करणाऱ्या राज्यातील मुंबई येथील एम.टी.एज्युकेअर, मुंबई या संस्थेने इयत्ता १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे खाजगी प्रशिक्षण वर्ग पूर्ण केलेले नाही. ही बाब शासनास निदर्शनास आल्यामुळे या संस्थेस संदर्भ क्र.३,४,५ व ६ येथील शासन निर्णयान्वये, इयत्ता१२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी वितरीत केलेले रु.१२,५०,०००/- वसूल करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. त्यानुसार एम.टी.एज्युकेअर, मुंबई, गर्जतो मराठी, बोरीवली, मुंबई तसेच शेतकरी शिक्षण संस्था, अमरावती या सस्थेस रु.४५,६४,०००/- (अक्षरी पंचेचाळीस लक्ष चौसष्ट हजार फक्त) इतके अनुदान सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उक्त योजनेसाठी अर्थसंकल्पीत केलेल्या तरतुदीमधून **परिशिष्ट-"अ"** मध्ये नमूद केल्याप्रमाणे वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी सदर रक्कम आहरीत करण्यासाठी अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग नियंत्रण अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

२. सदर रकमेचा Electronic Clearing Service (ECS) अवर सचिव (१), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे काढण्यात यावा.

३. संबंधित संस्थांची वेळोवेळी तपासणी करण्यात येईल. सदर तपासणी मध्ये संस्थेकडून सदर योजना राबविण्यात अनियमितता आढळल्यास वितरीत अनुदानाची वसूली करुन दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. संबंधित प्रशिक्षण संस्थेने या बाबतचा वर्षनिहाय लेखाविषयक तपशिल ठेवावा तसेच ज्या बाबींसाठी अनुदान वितरित करण्यात आले आहे त्या बाबींवरच खर्च करण्यात यावे. या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित प्रशिक्षण संस्थेने शासनास सादर करणे आवश्यक राहील. सदर बाबींचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास **परिशिष्ट "ब"** येथे नमूद केल्याप्रमाणे सादर करणे बंधनकारक राहील. अल्पसंख्याक विकास विभागाचे अधिकारी संबंधित प्रशिक्षण संस्थेस भेट देतील.

४. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ८ व ९ येथील अनुक्रमे दिनांक १८.०४.२०१७, ०६.०२.२०१८ व ३०.०६.२०१७ रोजीच्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामधील मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. यासाठी होणारा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता मागणी क्र. झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) अल्पसंख्याकांना सहाय्य, (०१)(०१) मोफत शिकवणी व संलग्न योजना याकरीता सहायक अनुदान (२२३५ ए ०८९), ३१ सहायक अनुदान या लेखाशीर्षाखाली मंजूर असलेल्या अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११७४५५२८९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf,
2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.03.31 23:45:57 +05'30'

(दि. मा. सोनवणे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संबंधित संस्था (पत्राने)

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मंत्री / मा.राज्यमंत्री (अ.वि.) यांचे खाजगी सचिव,
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६. महालेखापाल , १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, (प्रसिध्दीसाठी)
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
९. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११. कक्ष अधिकारी कार्यासन-७ / २ (रोखशाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मुंबई.
१४. निवडनस्ती (कार्यासन-९)

शासन निर्णय,अल्पसंख्याक विकास विभाग क्र. मोशियो-२०१८/प्र.क्र.३६/का-९, दि. ३१ मार्च, २०१८

परिशिष्ट - "अ"

अ. क्र.	केंद्र	संस्थेचे नांव	अभ्यासक्रम	मंजूर विद्यार्थी संख्या	८५% उपस्थिती पूर्ण असलेले विद्यार्थी संख्या	संस्थांना अदा करण्यात यावयाची रक्कम / निधी	टप्पानिहाय अनुदान मंजूरीसाठी प्रस्ताव	मंजूर अनुदान (रु.)
१	२	३	४	५	६	७	८	९
१	मुंबई	एम.टी.एज्युकेअर, मुलूंड, मुंबई	सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षण (CET) सन २०१५-१६ करीता १२ वी द्वितीय वर्ष	१२०	९१	रु.२००००/- प्रति उमेदवार प्रतिवर्ष किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारी फी यापैकी जी कमी असेल ती रक्कम दोन वर्षासाठी कमाल मर्यादा रु.४०,०००/-	अंतिम निकालानंतर ३०% =(९१x२००००x३०) /१०० = रु.५,४६,०००/-	रु.३८,०४, ०००/-
			सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षण (CET) सन २०१६-१७ करीता ११ वी प्रथम वर्ष	१२०	१०५		संस्थांची निवड केल्यानंतर १०% =(१२०x२००००x१०)/१०० =रु.२,४०,०००/-	
			सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षण (CET) सन २०१६-१७ करीता ११ वी प्रथम वर्ष	१२०	१०५		सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षण ६०% =(१०५x२००००x६०)/१०० =रु.१२,६०,०००/-	

			सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षण (CET) सन २०१६-१७ करीता ११ वी प्रथम वर्ष	१२०	१०५		अंतिम निकालानंतर ३०% =(१०५x२००००x३०)/१०० =रु.६,३०,०००/-	
			सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षण (CET) सन २०१६-१७ करीता १२ वी द्वितीय वर्ष	१२०	९१		संस्थांची निवड केल्यानंतर १०% =(१२०x२००००x१०)/१०० =रु.२,४०,०००/-	
			सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षण (CET) सन २०१६-१७ करीता १२ वी द्वितीय वर्ष	१२०	९१		सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षण ६०% =(९१x२००००x६०)/१०० =रु.१०,९२,०००/-	
			सामाईक प्रवेश परीक्षा प्रशिक्षण (CET) सन २०१६-१७ करीता १२ वी द्वितीय वर्ष	१२०	९१		अंतिम निकालानंतर ३०% =(९१x२००००x३०)/१०० =रु.५,४६,०००/-	
			इ.१० वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरीता विशेष शिकवणी सन २०१६-१७ करीता	१२५	१२५	इ.१० वी साठी प्रति उमेदवार रु.४०००/-	संस्थाची निवड केल्यानंतर १०% =(१२५x४०००x१०)/१०० =रु.५०,०००/-	

							परीक्षेनंतर ७०% =(१२५x४०००x७०) /१०० =रु.३,५०,०००/-	
							अंतिम निकालानंतर २०% =(१२५x४०००x००) /१०० =रु.१,००,०००/-	
						एकूण	रु.५०,५४,०००/-	
	रु.१२,५०,०००/-वजा(-) रु.५०,५४,०००/- असे रु.३८,०४,०००/- मंजूर अनुदान							
२	मुंबई	गर्जतो मराठी, बोरीवली, मुंबई	बँकिंग सेवा स्पर्धा परीक्षा सन २०१६-१७	२०	२०	रु.८०००/- प्रति उमेदवार किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारी फी यापैकी जी कमी असेल ती रक्कम.	संस्थाची निवड झाल्यानंतर २५% =(२०x८०००x२५)/ १०० =रु.४०,०००/-	रु.१,६०,००० /-
							मुख्य परीक्षेनंतर ५०% =(२०x८०००x५०)/ १०० =रु.८०,०००/-	
							अंतिम निकालानंतर २५% =(२०x८०००x२५)/ १०० =रु.४०,०००/-	
	मुंबई केंद्र एकूण रु.३९,६४,०००/- (अक्षरी रुपये एकोणचाळीस लक्ष चौसष्ट हजार फक्त)							
३	अमरावती	शेतकरी शिक्षण संस्था, अमरावती	केंद्रीय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा सन २०१५-१६ करीता	२०	२०	रु.२५०००/- प्रति उमेदवार किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारी फी यापैकी जी	पूर्व परीक्षेनंतर २५% =(२०x२५०००x२५) /१०० =रु.१,२५,०००/-	रु.६,००,००० /-

						कमी असेल ती रक्कम		
							मुख्य परीक्षेनंतर २५% =(२०x२५०००x२५) /१०० =रु.१,२५,०००/-	
							अंतिम निकालानंतर २५% =(२०x२५०००x२५) /१०० =रु.१,२५,०००/-	
			राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा सन २०१५-१६ करीता	१५	१५	रु.२००००/- प्रति उमेदवार किंवा संस्थेमार्फत आकारण्यात येणारी फी यापैकी जी कमी असेल ती रक्कम	पूर्व परीक्षेनंतर २५% =(१५x२००००x२५) /१०० =रु.७५,०००/-	
							मुख्य परीक्षेनंतर २५% =(१५x२५०००x२५) /१०० =रु.७५,०००/-	
							अंतिम निकालानंतर २५% =(१५x२५०००x२५) /१०० =रु.७५,०००/-	
	अमरावती केंद्र एकूण रु.६,००,०००/- (अक्षरी रुपये सहा लक्ष फक्त)							
	एकूण रु.४५,६४,०००/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस लक्ष चौसष्ट हजार फक्त							

(दि.मा.सोनवणे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

शासन निर्णय,अल्पसंख्याक विकास विभाग क्र. मोशियो-२०१८/प्र.क्र.३६/का-९, दि. ३१ मार्च, २०१८.

परिशिष्ट - "ब"

उपयोगिता प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक लोकसमूहातील उमेदवारांकरिता सुरू करण्यात आलेल्या **"मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना"** या योजनेंतर्गत शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र.**मोशियो-२०१८/प्र.क्र.३६/का-९, दि.३१ मार्च, २०१८** अन्वये वितरित केलेला रु. (अक्षरी रु.) एवढा निधी पुढील अभ्यासक्रमासाठी उमेदवारांना शिकविण्यासाठी उपयोगात आणला आहे :-

अभ्यासक्रमाचे नाव	विद्यार्थी संख्या	वर्ष	एकूण मंजूर अनुदान	खर्च
अ.				
ब.				
क.				
ड.				

असेही प्रमाणित करण्यात येते की, **"मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजनेंतर्गत** ज्या निकष / अटींनुसार शासनाने अनुदान मंजूर केले होते, त्या निकष/ अटींची यथायोग्यरित्या पूर्तता करण्यात आली आहे. तसेच ज्या प्रयोजनाकरिता निधी मंजूर करण्यात आला होता, त्याच प्रयोजनाकरिता निधीचा प्रत्यक्षात विनियोग झाला आहे. तसेच केंद्र शासनाच्या योजनेतील विद्यार्थी व राज्य शासनाच्या योजनेतील विद्यार्थी यांची पुनरावृत्ती झालेली नाही, याची हमी देण्यात येत आहे. पुनरावृत्ती झाल्यास अनुदान राज्य शासनास परत करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

संस्था अध्यक्ष यांची स्वाक्षरी	संस्था सचिव यांची स्वाक्षरी
नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा	नाव तारीख स्थळ कार्यालय मुद्रा

***